# नगर परिषद कार्यालय,मलकापूर

प्रशासकीय (सर्वसाधारण) सभा दिनांक 30/06/2022

## कार्यवृत्त

आज दिनांक 30/06/2022 रोजी सकाळी 11 वाजता मा.प्रशासक महोदय,नगर परिषद मलकापूर यांचे दालनात पाणी पुरवठा अभियंता, आरोग्य निरीक्षक,नगर अभियंता नगर परिषद मलकापूर यांनी सादर केलेल्या खालील विषयाकरीता प्रशासकीय सर्वसाधारण सभेचे आयोजन करण्यात आले होते.

1. जलशुध्दीकरण केंद्रावरील पाणी पुरवठा विभागाचे ऑफिसचे नुतणीकरण करणे.
2. मलकापूर शहरातील पारपेठ भागातील ताजनगर भागात पाईप लाईन टाकणे.
3. प्रभाग क्र.9 मध्ये ईदगाह रोड पासून ते गुलाब शाह यांचे घरापर्यंत 6 इंची व 4 इंची पीव्हीसी पाईप लाईन टाकणे.
4. सय्यद यांच्या घरापासून ते कन्याशाळा पर्यंत 8 इंची पीव्हीसी पाईप लाईन टाकणे.
5. राधाकिसन चाळमध्ये गणेश प्रिंटींग प्रेस यांच्या घरापासून ते जुने आमदार कार्यालयापर्यंत जुनी सिमेंट पाईपलाईन काढून 4 इंची पीव्हीसी पाईपलाईन टाकणे.
6. नसवाला चौक ते आर.एस.पाटील 10 इंची पीव्हीसी पाईपलाईन वरील मावळे ट्रेलर दुकानासमोरील 10 इंची पीव्हीसी पाईपलाईनला जोडणे तसेच अंतर्गत गल्ल्यामध्ये पाईपलाईन व अंतर्गत कामे करणे.
7. चाळीस बिघा भागातील शाळा क्र.4 लायबरीसाठी विंधन विहीर टाकणे.
8. बेरी कब्रस्तान समोरील 10 इंची व्हॉल चेंबर मधील पाणी नदीत पास करण्यासाठी 300 मीमी व्यास पाईप आरसीसी पाईप व ढापा टाकणे.
9. घनकचरा व्यवस्थापन डी.पी. आर.अंतर्गत क्षेपणभूमीवर सुरु असलेल्या विविध कामांना कोविड-19 आपत्तीमुळे क्षेपणभूमीवर विद्युत जोडणी पुरवठा उपलब्ध नसल्यामुळे विविध कामांना झालेल्या विलंबास अनुसरुन 6 महिने मुदतवाढ देणेबाबत
10. डंपीग ग्राऊंड वे-ब्रिज करीता फाऊंडेशन बनविणेबाबत.
11. मौजे खापरखेडा घनकचरा व्यवस्थापन साईड पाईप कल्व्हर्टचे काम करण्याबाबत
12. न.प.फंडातून त्रयस्त देयके अदा करण्याबाबत निर्णय घेणे.



Scanned with CamScanner

13. सन 2021-22 मध्ये 14 व्या वित्त आयोग निधी अंतर्गत घनकचरा संकलन व वहातूकीचे कामास 2022-2023 करिता दिनांक 01 जुलै 2022 ते 31 ऑगस्ट 2022 पर्यत सन 2021-2022 चे कंत्राटदारास मुदत वाढ देणे.

14. सन 2021-2022 मध्ये 15 व्या वित्त आयोग निधी अंतर्गत घनकचरा प्रक्रियेचे कामास 2022-2023 करिता दिनांक 01 जुलै 2022 ते 31 ऑगस्ट 2022 पर्यत सन 2021-2022 चे कंत्राटदारास मुदत वाढ देणे.

15. आमदार स्थानिक निधी विकास कार्यक्रम अंतर्गत मलकापूर नगर परिषदेस प्राप्त रुग्णवाहिका नागरिकांच्या सेवेसाठी चालविण्यास देणेबाबत निर्णय घेणे.

16. न.प. चे क्षेपणभूमीवर सर्व उपकरणे व सुविधा सुरळीत करणेसाठी आवश्यक उपाययोजना करणेबाबत.

17. प्रभाग क्र.3 मध्ये नाली बांधकामबाबत.(न.प.निधी.नगरोत्थान,दलितेत्तर निधी अंतर्गत)

18. प्रभाग क्र.13 मध्ये नाली बांधकाम करणेबाबत निर्णय घेणे.(न.प.निधी.नगरोत्थान,दलितेत्तर निधी अंतर्गत)

19. न.प.हद्दीतील विविध प्रभागात करावयाच्या विकास कामे करण्याबाबत

वरील विषयानुसार पाणी पुरवठा अभियंता,आरोग्य निरीक्षक,लेखापाल,नगर अभियंता नगर परिषद मलकापूर यांनी टिपण्या सादर केल्या त्यानुसार मा.मुख्याधिकारी यांच्या टिप्पणीचे वाचन सभे समोर करण्यात आले.

**विषय क्र. 1 :- जलशुध्दीकरण केंद्रावरील पाणी पुरवठा विभागाचे ऑफिसचे नुतणीकरण करणे.**

जलशुध्दीकरण केंद्रावरील पाणी पुरवठा विभागाचे ऑफिसचे नुतणीकरण करणेबाबतच्या विषयाची मा.मुख्याधिकारी नगर परिषद मलकापूर यांच्या टिप्पणीचे वाचन सभेसमोर करण्यात आले.त्यावर विस्तृत चर्चा करण्यात आली.

ठरविण्यात येते की,जलशुध्दीकरण केंद्रावर पाणी पुरवठा अभियंता यांचे कार्यालय असून मा.सभापती व मा.अध्यक्ष महोदय यांना बसण्याकरिता पुरेशी व्यवस्था नसुन कार्यालयाची अवस्था जीर्ण झाली आहे.पावसाळयामध्ये कार्यालयाला दरवाजे,खीडक्या तुटलेले आहे.त्यामुळे पाणी पुरवठा कार्यालयामध्ये पाणी येण्याची शक्यता नाकारता येत नाही.अशा परिस्थितीत कार्यालयाची दुरुस्ती करणे अत्यंत आवश्यक आहे.असे सभेच्या निदर्शनास आणून दिले.



Scanned with CamScanner

वरील सर्वबाबींचा विचारकरता जलशुध्दीकरण केंद्रावरील पाणी पुरवठा विभागाचे ऑफिसचे नुतणीकरण करणे गरजे आहे.यामध्ये दरवाजा,खिडक्याच्या फ्रेमसह काचा बदलणे आवश्यक असल्याने सदर काम नगर परिषद निधी / 15 व्या वित्त आयोग निधी अंतर्गत करण्यास व येणाऱ्या खर्चास ही सभा प्रशासकीय मान्यता देत आहे.

**विषय क्र. 2 :- मलकापूर शहरातील पारपेठ भागातील ताजनगर भागात पाईप लाईन टाकणे.**

मलकापूर शहरातील पारपेठ भागातील ताजनगर भागात पाईप लाईन टाकणेबाबतच्या विषयाच्या कामाची मा.मुख्याधिकारी नगर परिषद मलकापूर यांच्या टिपणीचे वाचन सभेसमोर करण्यात आले.त्यावर विस्तृत चर्चा करण्यात आली.

ठरविण्यात येते की, मलकापूर शहरातील पारपेठ ताजनगर भागातील नागरीकांचे पाणी मिळणेबाबत,नळ कनेक्शन मिळणेबाबत कार्यालयात अर्ज प्राप्त झाले आहे.तसेच या भागातील नागरीकांना वेळोवेळी पाणी पुरवठा मिळणेबाबत कार्यालयात येऊन भेटी दिल्या आहेत. सदर भागात पाईपलाईन टाकलेली नाही.तेथील नागरीकांची पाण्याची वाढती मागणी नुसार खालील भागात पीव्हीसी पाईपलाईन टाकणे आवश्यक आहे.

1. ताजनगर भागातील सलाम पहेलवान घरापासुन ते लतीफ जागीदार घरापर्यत 6 इंची पीव्हीसी पाईपलाईन टाकणे.
2. ताजनगर भागातील गल्ली नं.2 मंजूर हुसेन यांच्या घरापासून ते सै.बबलू यांच्या घरापर्यत 4 इंची पीव्हीसी पाईपलाईन टाकणे.आवश्यक असल्याचे सभेच्या निदर्शनास आणून दिले.

वरील सर्वबाबींचा विचार करता उपरोक्त नमुद ताजनगर भागातील काम क्रमांक 1 व 2 मध्ये 6 इंची व 4 इंची पाईपलाईन टाकण्यास व याकरीता येणारा खर्च नगर परिषद निधी / 15 वा वित्त आयोग निधीतुन करण्यास हि सभा प्रशासकीय मान्यता देत आहे.

**विषय क्र. 3 :- प्रभाग क्र.9मध्ये ईदगाह रोड पासून ते गुलाब शाह यांचे घरापर्यत 6 इंची व 4 इंची पीव्हीसी पाईप लाईन टाकणे.**

प्रभाग क्र.9 मध्ये ईदगाह रोड पासून ते गुलाब शाह यांचे घरापर्यत 6 इंची व 4 इंची पीव्हीसी पाईप लाईन टाकणेबाबतच्या कामाची मा.मुख्याधिकारी



Scanned with CamScanner

नगर परिषद मलकापूर यांच्या टिपणीचे वाचन सभेसमोर करण्यात आले.त्यावर विस्तृत चर्चा करण्यात आली

ठरविण्यात येते की,पारपेठ भागातील ईदगाह भागात जूनी पीव्हीसी पाईप लाईन आहे.ती पाईप लाईन वारंवार लिकेंज होत असते.तसेच त्या भागातील लोकांच्या तक्रारी वारंवार येत असतात.सदर भागातील बहुतांश ठिकाणी पाणी पोहचत नाही.त्यामुळे सदर नागरीकांना पाणी टंचाईचा सामना करावा लागत आहे.जूनी 4 इंची पीव्हीसी पाईप लाईनला प्रेशर असल्यामुळे लिकेंजवर येणारा खर्च मोठया स्वरुपात होत आहे.जूनी पीव्हीसी पाईप लाईन असल्यामुळे तेथील माजी नगरसेवक सनाउल्लाखा जमादार व नागरीकांची पाण्याची वाढती मागणीनुसार जूनी 4 इंची पीव्हीसी पाईप लाईन काढून टाकून त्याजागी नविन 6 इंची व 4 इंची पीव्हीसी पाईप लाईन टाकणे आवश्यक आहे.जेणे करुन सर्व नागरीकांना पाणी पुरवठा करता येईल. असे पाणी पुरवठा अभियंता यांनी सभेच्या निदर्शनास आणून दिले.

वरील सर्वबाबींचा विचार करता, ईदगाह भागातील जुनी पाईप लाईन काढून प्रभाग क्र.9 मध्ये ईदगाह रोड पासून ते गुलाब शाह यांचे घरापर्यत 6 इंची व 4 इंची पीव्हीसी पाईप लाईन टाकण्याकरीता नगर परिषद निधी / 15 वा वित्त आयोग निधी अंतर्गत करण्यास ही सभा प्रशासकीय मान्यता देत आहे.

**विषय क्र. 4. :- सय्यद यांच्या घरापासून ते कन्याशाळा पर्यत 8 इंची पीव्हीसी पाईप लाईन टाकणे.**

सय्यद यांच्या घरापासून ते कन्याशाळा पर्यत 8 इंची पीव्हीसी पाईप लाईन टाकणेबाबतच्या कामाची मा.मुख्याधिकारी नगर परिषद मलकापूर यांच्या टिपणीचे वाचन सभेसमोर करण्यात आले.त्यावर विस्तृत चर्चा करण्यात आली.

ठरविण्यात येते की, पारपेठ भागातील सय्यद यांच्या घरापासून ते कन्याशाळा पर्यत तेथील नागरीकांची तक्रारी पाणी मिळण्याकरीता येत असतात.जुनी सिमेंट लाईन आहे.ती पाईप लाईन वारंवार लिकेज होत असते.सदर भागातील बहुतांश ठिकाणी पाणी पोहचत नाही.त्यामुळे सदर नागरीकांना पाणी टंचाईचा सामना करावा लागत आहे.सिमेंट लाईन असल्यामुळे लिकेंज दुरुस्तीवर येणारा खर्च मोठया स्वरुपात होत आहे.जुनी सिमेंट लाईन असल्यामुळे साहित्य सुध्दा बाजारपेठेमध्ये सहजासहजी उपलब्ध होत नाही.तेथील नागरीकांची पाण्याची वाढती मागणी नुसार सिमेंट पाईप



Scanned with CamScanner

लाईन काढून पीव्हीसी पाईप लाईन टाकणे आवश्यक आहे.असे सभेच्या निदर्शनास आणून दिले.

वरील सर्वबाबींचा विचार करता सय्यद यांच्या घरापासून ते कन्याशाळा पर्यंत 8 इंची पीव्हीसी पाईप लाईन टाकण्यास व यासाठी येणाऱ्या खर्चास नगर परिषद निधी / 15 वा वित्त आयोग निधी अंतर्गत करण्यास व त्यासाठी येणाऱ्या खर्चास ही सभा प्रशासकीय मान्यता देत आहे.

**विषय क्र. 5. :- राधाकिसन चाळमध्ये गणेश प्रिंटींग प्रेस यांच्या घरापासून ते जुने आमदार कार्यालयापर्यंत जुनी सिमेंट पाईप लाईन काढून 4 इंची पीव्हीसी पाईप लाईन टाकणे.**

राधाकिसन चाळमध्ये गणेश प्रिंटींग प्रेस यांच्या घरापासून ते जुने आमदार कार्यालयापर्यंत जुनी सिमेंट पाईप लाईन काढून 4 इंची पीव्हीसी पाईप लाईन टाकण्याबाबतच्या कामाची मा.मुख्याधिकारी नगर परिषद मलकापूर यांचे टिपणीचे वाचन सभेसमोर करण्यात आले.त्यावर विस्तृत चर्चा करण्यात आली.

ठरविण्यात येते की,राधाकीसन चाळ भागात जुनी सिमेंट लाईन आहे.ती पाईप लाईन वारंवार लिकेंज होत असते तसेच त्या भागातील प्रदीप टावरी,डॉ.फिरके,अग्रवाल,मन्नालाल कन्हैयालाल संचेती इत्यादी लोकांच्या तक्रारी वारंवार येत असतात.सदर भागातील बहुतांश ठिकाणी पाणी पोहचत नाही.त्यामुळे सदर नागरीकांना पाणी टंचाईचा सामना करावा लागत आहे.सिमेंट लाईन असल्यामुळे लिकेज दुरुस्तीसाठी येणाऱ्या खर्च मोठया स्वरुपात होत आहे.जुनी सिमेंट लाईन असल्यामुळे साहित्य सुध्दा बाजारपेठेमध्ये सहजासहजी उपलब्ध होत नाही.तेथील नागरीकांची पाण्याची वाढती मागणीनुसार सिमेंट पाईप लाईन काढून पीव्हीसी पाईप लाईन टाकणे आवश्यक आहे.जेणे करुन सर्व नागरीकांना पाणी पुरवठा करता येईल.असे पाणी पुरवठा अभियंता यांनी सभेच्या निदर्शनास आणून दिले.

वरील सर्वबाबींचा विचारकरता राधाकिसन चाळमध्ये गणेश प्रिंटींग प्रेस यांच्या घरापासून ते जुने आमदार कार्यालयापर्यंत जुनी सिमेंट पाईप लाईन काढून 4 इंची पीव्हीसी पाईप लाईन टाकण्याच्या व सदर कामाकरीता येणारा खर्च नगर परिषद निधी / 15 वा वित्त आयोग निधी अंतर्गत करण्यास ही सभा प्रशासकीय मान्यता देत आहे.



Scanned with CamScanner

विषय क्र. 6 :- **नसवाला चौक ते आर.एस.पाटील 10 इंची पीव्हीसी पाईप लाईन वरील मावळे टेलर दुकानासमोरील 10 इंची पीव्हीसी पाईप लाईनला जोडणे तसेच अंतर्गत गल्ल्यामध्ये पाईप लाईन व अंतर्गत कामे करणे.**

नसवाला चौक ते आर.एस.पाटील 10 इंची पीव्हीसी पाईप लाईन वरील मावळे ट्रेलर दुकानासमोरील 10 इंची पीव्हीसी पाईप लाईनला जोडणे तसेच अंतर्गत गल्ल्यामध्ये पाईप लाईन व अंतर्गत कामे करण्याबाबतच्या कामाची मा.मुख्याधिकारी नगर परिषद मलकापूर यांच्या कार्यालयीन टिपणीचे वाचन सभेसमोर करण्यात आले.त्यावर विस्तृत चर्चा करण्यात आली.

ठरविण्यात येते की, मलकापूर शहरातील जुन्या भागातील प्रभाग क्र.11 मध्ये नसवाला चौक ते आर.एस.पाटील 10 इंची पीव्हीसी पाईप लाईन वरील मावळे टेलर दुकानासमोर 10 इंची पीव्हीसी पाईप लाईन टाकण्यात आलेली आहे.त्या पाईप लाईनद्वारे गल्ल्यामध्ये गढूळ व दुषीत पाणी पुरवठा नागरीकांना होत आहे.तसेच त्याभागातील लोकांच्या तक्रारी वारंवार येत असतात.त्यामुळे तेथील गल्ल्यामध्ये पीव्हीसी पाईप लाईन टाकणे व अंतर्गत कामे करणे आवश्यक आहे.जेणे करुन सर्व नागरीकांना पाणी पुरवठा सुरळीत करता येईल. असे पाणी पुरवठा अभियंता यांनी सभेच्या निदर्शनास आणून दिले.

वरील सर्वबाबींचा विचार करता नसवाला चौक ते आर.एस.पाटील 10 इंची पीव्हीसी पाईप लाईन वरील मावळे ट्रेलर दुकानासमोरील 10 इंची पीव्हीसी पाईप लाईनला जोडणे तसेच अंतर्गत गल्ल्यामध्ये पाईप लाईन व अंतर्गत कामे 15 वा वित आयोग / नगर परिषद निधी अंतर्गत करण्यास ही सभा प्रशासकीय मान्यता देत आहे.

विषय क्र. 7 :- **चाळीस बिघा भागातील शाळा क्र.4 लायबरीसाठी विंधन विहीर टाकणे.**

चाळीस बिघा भागातील शाळा क्र.4 लायबरीसाठी विंधन विहीर टाकण्याबाबतची मा.मुख्याधिकारी नगर परिषद मलकापूर यांच्या टिपणीचे वाचन सभेसमोर करण्यात आले.त्यावर विस्तृत चर्चा करण्यात आली.

ठरविण्यात येते की,चाळीस बिघा भागातील शाळा क्र.04 येथे लायबरी होत आहे.भुजल सर्वेक्षण,बुलडाणा यांच्याकडून मान्यता प्राप्त झालेली आहे.तसेच लायबरीत येणारे विद्यार्थ्यांना पाणी पिण्याकरीता व झाडांची रोपे वाढविण्याकरीता पाण्याची आवश्यकता भासत असते त्यामुळे येणारे विद्यार्थीची



Scanned with CamScanner

गैरसोय होणार नाही त्याकरीता विंधन विहीर करणे आवश्यक आहे.तरी सदर कामांना मा.मुख्याधिकारी व प्रशासक साहेब यांनी कार्योत्तर मंजूरी प्रदान केली आहे.असे पाणी पुरवठा अभियंता यांनी सभेच्या निदर्शनास आणून दिले.

वरील सर्वबाबींचा विचारकरता चाळीस बिघा भागात नव्याने बांधण्यात येणाऱ्या लायबरीच्या प्रांगणामध्ये 6 इंची विधंन विहीर घेण्याकरीता सक्षम प्राधिकरणाने मंजूरी दिलेली आहे.त्यांनुसार चाळीसबिघा मध्ये नव्याने होणाऱ्या लायबरीच्या प्रांगणामध्ये 6 इंची विंधन विहीर घेण्यास व त्याकरीता आलेल्या खर्चास ही सभा प्रशासकीय कार्योत्तर मान्यता देत आहे.

**विषय क्र. 8. :- बेरी कब्रस्तान समोरील 10 इंची व्हॉल चेंबर मधील पाणी नदीत पास करण्या साठी 300 मीमी व्यास पाईप आरसीसी पाईप व ढापा टाकणे.**

बेरी कब्रस्तान समोरील 10 इंची व्हॉल चेंबर मधील पाणी नदीत पास करण्यासाठी 300 मीमी व्यास पाईप आरसीसी पाईप व ढापा टाकणेबाबतच्या कामाची मा.मुख्याधिकारी नगर परिषद मलकापूर यांच्या टिपणीचे वाचन सभेसमोर करण्यात आले.त्यावर विस्तृत चर्चा करण्यात आली

ठरविण्यात येते की,सालीपुरा भागातील बेरी कब्रस्तान येथील पाणी पुरवठा विभागाचे 4 व्हॉल असून त्यामधून विविध भागात पाणी पुरवठा केला जात असतो.व्हॉलच्या बाजुला नाली असल्यामुळे नालीतील घाण व गढूळ पाणी व्हॉलमध्ये जाऊन घाण व गढूळ पाणी येण्याची शक्यता नाकारता येत नाही.त्यामुळे तेथील नागरीकांची तक्रारीनुसार बेरी कब्रस्तान समोरच्या व्हॉल चेंबर मध्ये 300 मीमी व्यास पाईप टाकून ढापा टाकणे बनविणे आवश्यक आहे.असे पाणी पुरवठा अभियंता,न.प.मलकापूर यांनी सभेच्या निदर्शनास आणून दिले आहे.

वरील सर्वबाबींचा विचार करता सदर काम करण्यास व त्याकरीता येणारा खर्च हा नगर परिषद निधी /15 वा वित्त आयोग निधी अंतर्गत करण्यास हि सभा प्रशासकीय मान्यता देत आहे.

**विषय क्र.9 :- घनकचरा व्यवस्थापन डी.पी. आर.अंतर्गत क्षेपणभूमीवर सुरु असलेल्या विविध कामांना कोविड-19 आपत्तीमुळे,क्षेपणभूमीवर विद्युत जोडणी / पुरवठा उपलब्ध नसल्यामुळे विविध कामांना झालेल्या विलंबास अनुसरुन मुदतवाढ देणेबाबत**



Scanned with CamScanner

घनकचरा व्यवस्थापन डी.पी. आर.अंतर्गत क्षेपणभूमीवर सुरु असलेल्या विविध कामांना कोविड-19 आपत्तीमुळे,क्षेपणभूमीवर विद्युत जोडणी / पुरवठा उपलब्ध नसल्यामुळे विविध कामांना झालेल्या विलंबास अनुसरुन मुदतवाढ देणेबाबतच्या कामाची मा.मुख्याधिकारी नगर परिषद मलकापूर यांच्या टिपणीचे वाचन सभेसमोर करण्यात आले.त्यावर विस्तृत चर्चा करण्यात आली

ठरविण्यात येते की,मलकापूर नगर परिषद क्षेपणभूमीवर घनकचरा व्यवस्थापन डी.पी.आर.अंतर्गत क्षेपण भूमीवर सुरु असलेल्या विविध कामांना कोविड-19 च्या अनुषंगाने उपाययोजना अंतर्गत राज्यात निर्बंध लागू होते.त्यामुळे क्षेपणभूमीवरील सुरु असलेल्या कामांना विविध अडथळे आल्यामुळे जसे कि साहित्य-सामुग्रीची उपलब्धता,मजुरांची उपलब्धता नसणे यामुळे कामे विहित मुदतीत पूर्ण करता आलेली नाहीत.यापूर्वी सदर कामांना सर्वसाधारण सभा ठराव क्र.5 दिनांक 08/06/2021 नुसार मागील मुदतीसह ठरावापासून 4 महिने मुदतवाढ देण्यात आली होती.परंतू नगर परिषद तर्फे क्षेपण भूमीवर विद्युत जोडणी / पुरवठा उपलब्ध करुन देण्यास विलंब झाल्यामुळे विद्युत पुरवठयावर आधारित विविध मशिनरी इंस्टाल करणे शक्य नव्हते,तरी सदर विद्युत जोडणी/पुरवठा करण्याचे काम हे पूर्णत्वाच्या मार्गावर आहेत.तसेच बायोमायनिंगचे काम सुध्दा मशीन विलंबाने आल्यामुळे त्यास मुदतीमध्ये करणे शक्य झाले नाही.त्यामुळे बायोमायनिगचे कंत्राटदार यांनी मुदतवाढ मिळणेबाबत विनंती केली असून डी.पी.आर. अंतर्गत क्षेपणभूमीवर सुरु असलेल्या विविध कामांना दिनांक 07/06/2022 पासून सहा महिने मुदतवाढ देऊन कामे लवकरात लवकर पूर्ण करुन घेणे गरजेचे आहे.असा आरोग्य निरीक्षक,न.प.मलकापूर यांनी अहवाल सादर केलेला आहे.

वरील सर्वबाबींचा विचारकरता उपरोक्त कामांना ठरावाच्या दिनांकापुर्वीच्या मुदतवाढीस कार्योत्तर मान्यता व यापुढे 07/11/2022 पर्यत अशी 6 (सहा महिने) महिने मुदतवाढीस हि सभा मान्यता देत आहे.

**विषय क्र. 10. :- डंपीग ग्राऊंड वे-ब्रिज करीता फाऊंडेशन बनविणेबाबत.**

डंपीग ग्राऊंड वे-ब्रिज करीता फाऊंडेशन बनविणेबाबतच्या कामाची मा.मुख्याधिकारी नगर परिषद मलकापूर यांच्या टिप्पणीचे वाचन सभेसमोर करण्यात आले.त्यावर विस्तृत चर्चा करण्यात आली



Scanned with CamScanner

ठरविण्यात येते की,खापरखेडा शिवारातील घनकचरा व्यवस्थापन साईटवर वे ब्रिजकरीता फाऊडेशन बनविणे हे अत्यंत जरुरीचे आहे. जेणे करुन वे-ब्रिजवर कचऱ्याचे मोजमाप घेणे सोईचे होईल.असा नगर अभियंता,बांधकाम विभाग यांनी अहवाल सादर केलेला आहे.

वरील सर्वबाबीचा विचार करता उपरोक्त काम हे तातडीने करुन घेणे आवश्यक असल्यामुळे या कामाकरीता सभेची मान्यता आवश्यक आहे.सदरचे काम हे 14 वा वित्त आयोग / न.प. निधी / 15 वा वित्त आयोग निधी मधुन करण्यास हि सभा मान्यता देत आहे.

**विषय क्र. 11. :- मौजे खापरखेडा घनकचरा व्यवस्थापन साईड पाईप कल्व्हर्टचे काम करण्याबाबत**

मौजे खापरखेडा घनकचरा व्यवस्थापन साईड पाईप कल्व्हर्टचे काम करण्याबाबत विषयाच्या कामाची मा.मुख्याधिकारी नगर परिषद मलकापूर यांच्या टिपणीचे वाचन सभेसमोर करण्यात आले.त्यावर विस्तृत चर्चा करण्यात आली.

ठरविण्यात येते की,मौजे खापरखेडा शिवारातील न.प.च्या घनकचरा व्यवस्थापन साईडवर जाण्या - येण्याकरीता रस्त्याचे काम पूर्ण झालेले असून रस्त्याच्या आजूबाजूस बऱ्याच ठिकाणी खड्डे असून पावसाळयात पाणी साचून रस्त्यावरुन वाहून रस्त्याची दुर्दशा होईल.व वाहनांना जाण्या-येण्यास रहदारीस अडथळा निर्माण होईल.त्याकरीता आवश्यक त्याठिकाणी पाईप कल्व्हर्ट करणे अत्यंत जरुरीचे असल्याबाबतचा अहवाल नगर अभियंता,बांधकाम विभाग यांनी सादर केलेला आहे.

वरील सर्वबाबींचा विचार करता सदरचे काम हे तातडीने करुन घ्यावयाचे असल्याने कंत्राटदाराकडून काम करुन घेण्यासाठी येणारा खर्च 14 वा वित्त आयोग / 15 वा वित्त आयोग /न.प.निधी मधून करण्यास ही सभा मान्यता देत आहे.

**विषय क्र.12. :- न.प.फंडातून त्रयस्त देयके अदा करण्याबाबत निर्णय घेणे.**

न.प.फंडातून त्रयस्त देयके अदा करण्याबाबत निर्णय घेण्याबाबतच्या विषयाची तसेच नगर परिषद कर्मचारी संघटनेने दिलेल्या निवेदनावरील मा.मुख्याधिकारी नगर परिषद मलकापूर यांच्या टिपणीचे वाचन सभेसमोर करण्यात आले.त्यावर विस्तृत चर्चा करण्यात आली.



Scanned with CamScanner

ठरविण्यात येते की,मा.प्रशासक यांच्या अहवाल मागणीनुसार दिनांक 24/02/2022 रोजीचा ठराव क्र. 1 नुसार नगर परिषद फंडातून त्रयस्त देयके अदा करण्यावर रोख लावली होती.त्यावर केलेल्या कार्यवाहीचा लेखाजोखा पुढीलप्रमाणे.

सदर ठरावानुसार सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांचे जवळपास 1,07,24,575/- रुपये अदा करण्यात आले आहे. 14,72,427/- EPF भरणा केला आहे.15 लक्ष रुपये संवर्ग कर्मचारी NPS भरणा 22,05,174/- D.A.अदा केलेला आहे. व शासनाकडून सातवा वेतन आयोग हप्ता अदा करण्यासाठी 5 कोटी 6 लक्ष प्राप्त झाले आहेत.सध्यास्थितीला जवळपास 2.5 कोटी देणे कर्मचाऱ्यांची बाकी असा अहवाल लेखापाल यांनी सादर केला आहे.सदर अहवालावर मुख्याधिकारी यांचे अभिप्रायानुसार न.प.निधीतून वरीलप्रमाणे रकमा अदा केल्या असून सद्यस्थितीत न.प.निधीतुन कामांची देयक पुर्णत: देणे थांबविले होते.परंतू सदर देयकाबाबत संदर्भिय कंत्राटदारांची बिल मागणी सातत्याने होत आहे.त्यामुळे सदर बिले अदा करणे आवश्यक आहे.असे नमुद केलेले आहे

यावर मलकापूर नगर परिषद कर्मचारी संघटनेने दिनांक 27/06/2022 रोजी दिलेल्या निवेदनानुसार नगर परिषद कर्मचारी,संवर्ग कर्मचारी व सेवानिवृत्त कर्मचारी यांची थकीत रक्कम मोठी असल्याने अंदाजीत रुपये 2.50 कोटी (दोन कोटी पन्नास लक्ष रुपये) देणे थकीत बाकी रहात आहे.

वरील सर्व परिस्थीती विचारात घेता नगर परिषद निधीच्या खात्यात जमा होणाऱ्या रक्कमेपैकी 50 % (पन्नास टक्के) निधी विकास कामांची देयके अदा करण्यास व 50% (पन्नास टक्के) निधी हा कर्मचाऱ्यांची देणी देण्याकरीता समप्रमाणात वाटप करण्यास ही सभा मान्यता देत आहे. मुख्याधिकारी व लेखापाल यांनी त्यानुसार कार्यवाही करावी.

**विषय क्र.13. :- सन 2021-22 मध्ये 14 व्या वित्त आयोग निधी अंतर्गत घनकचरा संकलन व वहातूकीचे कामास 2022-2023 करिता दिनांक 01 जुलै 2022 ते 31 ऑगस्ट 2022 पर्यत सन 2021-2022 चे कंत्राटदारास मुदत वाढ देणे.**

सन 2021-22 मध्ये 14 व्या वित्त आयोग निधी अंतर्गत घनकचरा संकलन व वहातूकीचे कामास 2022-2023 करिता दिनांक 01 जुलै 2022 ते 31 ऑगस्ट 2022 पर्यत सन 2021-2022 चे कंत्राटदारास मुदत वाढ



Scanned with CamScanner

देण्याबाबतच्या विषयाची मा.मुख्याधिकारी नगर परिषद मलकापूर यांच्या टिपणीचे वाचन सभेसमोर करण्यात आले.त्यावर विस्तृत चर्चा करण्यात आली.

ठरविण्यात येते की,घनकचरा संकलनाचे कामाकरिता सन 2022-2023 साठीचे अंदाजपत्रक तांत्रिक मान्यतेस महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांना पाठविण्यात आले आहे.परंतू अद्याप सदर तांत्रिक मंजुरात प्राप्त झालेली नाही.त्या अनुषंगाने मा.कार्यकारी अभियंता,महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांना दोन वेळा स्मरणपत्रसुध्दा देण्यात आलेले आहे.परंतू सदर तांत्रिक मंजूरात प्राप्त न झाल्याने पुढील निविदा प्रक्रिया करणे शक्य होत नाही.यामुळे निविदा प्रक्रिया प्रलंबित असल्या कारणाने तसेच सदर काम सुरु ठेवणे,शहरात स्वच्छता ठेवणे अत्यावश्यक असल्यामुळे नवीन निविदा प्रक्रिया पूर्ण होऊन कार्यारंभ आदेश होईपर्यत अथवा जास्तीत जास्त दोन महिने सदर कामास 15 व्या वित्त आयोग निधी अंतर्गत मुदतवाढ देणे आवश्यक आहे.करिता सदर मुदतवाढ देऊन सदर मुदतवाढीच्या कालावधीतील या कामाचा खर्च 15 व्या वित्त आयोगाच्या निधीमधून करण्यास सक्षम प्राधिकरणाची मान्यता घ्यावी.लागेल.त्यानुसार सदर कामाचे सन 2021-2022 चे कंत्राटदार सृष्टी एंटरप्राईजेस,गंगापूर यांना मूळ कराररनाम्यातील अटी शर्तीना अधीन राहून दिनांक 01/07/2022 ते दिनांक 31/08/2022 पर्यत दोन महिने मुदतवाढ देणे आवश्यक असल्याचे आरोग्य निरीक्षक,नगर परिषद मलकापूर यांनी अहवालाद्वारे सभेच्या निदर्शनास आणून दिले आहे.

वरील सर्वबाबींचा विचार करता आरोग्य निरीक्षक यांनी अहवालात नमुद केल्यानुसार सदर कामास सन 2021-2022 चे कंत्राटदार सृष्टी एंटरप्राईजेस,गंगापूर यांना मूळ करारनाम्यातील अटी शर्तीना अधीन राहून दिनांक 01/07/2022 ते दिनांक 31/08/2022 पर्यत दोन महिने मुदतवाढ देण्यास ही सभा मान्यता देत आहे.

**विषय क्र.14. :- सन 2021-2022 मध्ये 15 व्या वित्त आयोग निधी अंतर्गत घनकचरा प्रक्रियेचे कामास 2022-2023 करिता दिनांक 01 जुलै 2022 ते 31 ऑगस्ट 2022 पर्यत सन 2021-2022 चे कंत्राटदारास मुदत वाढ देणे.**



Scanned with CamScanner

सन 2021-2022 मध्ये 15 व्या वित्त आयोग निधी अंतर्गत घनकचरा प्रक्रियेचे कामास 2022-2023 करिता दिनांक 01 जुलै 2022 ते 31 ऑगस्ट 2022 पर्यत सन 2021-2022 चे कंत्राटदारास मुदत वाढ देण्याबाबतच्या विषयाची मा.मुख्याधिकारी नगर परिषद मलकापूर यांच्या टिपणीचे वाचन सभेसमोर करण्यात आले.त्यावर विस्तृत चर्चा करण्यात आली.

ठरविण्यात येते की,घनकचरा संकलनाचे कामाकरिता सन 2022-2023 साठीचे अंदाजपत्रक तांत्रिक मान्यतेस महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांना पाठविण्यात आले आहे.परंतू अद्याप सदर तांत्रिक मंजूरात प्राप्त झालेली नाही,त्या अनुषंगाने मा.कार्यकारी अभियंता,महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांना दोन वेळा स्मरणपत्र सुध्दा देण्यात आलेले आहे.परंतू सदर तांत्रिक मंजूरात प्राप्त न झाल्याने पुढील निविदा प्रक्रिया करणे शक्य होत नाही.यामुळे निविदा प्रक्रिया प्रलंबित असल्याकारणाने तसेच सदर काम सुरु ठेवणे अत्यावश्यक असल्यामुळे नगर परिषदेच्या सक्षम प्राधिकरणाच्या कार्योत्तर मंजुरीस अधीन राहून नवीन निविदा प्रक्रिया पूर्ण होऊन कार्यारंभ आदेश होईपर्यत अथवा जास्तीत जास्त दोन महिने सदर कामास 15 व्या वित्त आयोग निधी अंतर्गत मुदतवाढ देणे आवश्यक आहे.करिता सदर मुदतवाढ देऊन सदर मुदतवाढीच्या कालावधीतील या कामाचा खर्च 15 व्या वित्त आयोगाच्या निधीमधून करण्यास सक्षम प्राधिकरणाची मान्यता घ्यावी लागेल.त्यानुसार सदर कामाचे सन 2021-22 चे कंत्राटदार सृष्टी एंटरप्राइजेस,गंगापूर यांना मूळ करारनाम्यातील अटी शर्तीना अधीन राहून दिनांक 01/07/2022 ते दिनांक 31/08/2022 पर्यत एकूण दोन महिने मुदतवाढ देणे आवश्यक असल्याचे आरोग्य निरीक्षक,नगर परिषद मलकापूर यांनी अहवालात नमुद केले आहे.

वरील सर्व बाबींचा विचार करता आरोग्य निरीक्षक न.प.मलकापूर यांचे अहवालानुसार सदर कामाचे सन 2021-22 चे कंत्राटदार सृष्टी एंटरप्राइजेस,गंगापूर यांना मूळ करारनाम्यातील अटी शर्तीना अधीन राहून दिनांक 01/07/2022 ते दिनांक 31/08/2022 पर्यत एकूण दोन महिने मुदतवाढ देण्यास ही सभा मान्यता देत आहे.

**विषय क्र.15.** :- **आमदार स्थानिक निधी विकास कार्यक्रम अंतर्गत मलकापूर नगर परिषदेस प्राप्त रुग्णवाहिका नागरिकांच्या सेवेसाठी चालविण्यास देणेबाबत निर्णय घेणे.**



Scanned with CamScanner

आमदार स्थानिक निधी विकास कार्यक्रम अंतर्गत मलकापूर नगर परिषदेस प्राप्त रुग्णवाहिका नागरिकांच्या सेवेसाठी चालविण्यास देणेबाबत निर्णय घेण्याबाबतच्या विषयाची मा.मुख्याधिकारी नगर परिषद मलकापूर यांच्या टिपणीचे वाचन सभेसमोर करण्यात आले.त्यावर विस्तृत चर्चा करण्यात आली.

ठरविण्यात येते की,मा.आमदार स्थानिक विकास कार्यक्रम सन 2020 अंतर्गत निधीतून प्राप्त रुग्णवाहिकेचे सेवेचे निकष ठरविण्याबाबत निर्णय घेण्याबाबत मा.सर्वसाधारण सभा ठराव क्रं.10 दिनांक 24/06/2021 नुसार ठराव संमत करण्यात आला होता.त्यानुसार रुग्णवाहिकेचे पासींग झाल्यावर आर.टी.ओ.कार्यालयाकडून दरपत्रक घेऊन त्यानंतर पुढील कार्यवाही करणेसाठी सभेसमक्ष ठेवण्याचा निर्णय झाला होता.तरी त्यानुसार रुग्णवाहिकेची पासींग झालेली असून आर.टी.ओ. कार्यालयाकडून दरपत्रक सुध्दा प्राप्त झाले आहे.सदर दरपत्रक हे जिल्हा प्रादेशिक परिवहन प्राधिकरण,बुलडाणा यांचे दिनांक 16/11/2018 रोजीचे सभेनुसार ठरविण्यात आलेले आहे.

सदयस्थितीत रुग्णवाहिकेवर तात्पुरत्या चालकाची न.प.कडून व्यवस्था करण्यात आली असून त्यासाठी लागणारे इंधन व रखरखाव न.प.तर्फे पुरविण्यात येतो.तर यानुसार कार्यवाही केल्याने न.प.च्या उत्पन्नात वाढ होत नाही.तसेच न.प.कडे आवश्यक मनुष्यबळ उपलब्ध नसल्याने तात्पुरत्या चालकाद्वारे सदर काम करावे लागते.तरी सदर रुग्णवाहिका एखादया सेवाभावी संस्थेस चालविण्यास देऊन त्याद्वारे प्रति कि.मी. ठरावीक भरणा नगर परिषदेस करणे व आर.टी.ओ.च्या दरपत्रकापेक्षा कमीत कमी दराने रुग्णवाहिका चालविण्यास तयार असलेल्या सेवाभावी संस्थेस सदर रुग्णवाहिका चालविण्यास देता येईल.यासाठी जाहिर सुचेनेद्वारे अथवा इतर सुयोग्य मार्गाने सेवाभावी संस्थाकडून प्रस्ताव घेऊन सुयोग्य संस्थेस पुढील काम देता येऊ शकते.तसचे आर.टी.ओ.चे दरपत्रक सोबत जोडल्याचे आरोग्य निरीक्षक यांनी सभेच्या निदर्शनास आणून दिले आहे.

वरील सर्वबाबींचा विचार करता आरोग्य निरीक्षक,नगर परिषद मलकापूर यांनी सादर केलेल्या अहवालनुसार कार्यवाही करण्यास ही सभा मान्यता देत आहे.



Scanned with CamScanner

**विषय क्र.16 :- न.प. चे क्षेपणभूमीवर सर्व उपकरणे व सुविधा सुरळीत करणेसाठी आवश्यक उपाययोजना करणेबाबत.**

न.प. चे क्षेपणभूमीवर सर्व उपकरणे व सुविधा सुरळीत करणेसाठी आवश्यक उपाययोजना करण्याबाबतच्या विषयाची मा.मुख्याधिकारी नगर परिषद मलकापूर यांच्या टिपणीचे वाचन सभेसमोर करण्यात आले.त्यावर विस्तृत चर्चा करण्यात आली.

ठरविण्यात येते की,न.प.क्षेपणभूमीवर विविध उपकरणे मशीनरी खरेदी करण्याची प्रक्रीया सुरु असून त्याकरीता विविध उपायोजना जसे की,विद्युतीकरणाची व्यवस्था करणे,वे.ब्रिजसाठी फाऊडेशन करणे,लिचटसाठी सोकपीची व्यवस्थाकरणे एम.आर.एफ.शेड मध्ये कंपार्टमेंट तयार करणे,घंटागाडी खाली करणेसाठी प्लॅटफॉर्म तयार करणे,नामफलक बोर्ड लावणे,पेंटींग करणे व इतर स्वच्छ सर्व्हेक्षण व माझी वसुंधराच्या अनुषंगाने कामे करणे गरजेचे आहे.तसेच या कामांचा खर्च न.प.निधी अथवा 15 वा वित्त आयोग निधी मधून करावा लागेल.असा अहवाल आरोग्य निरीक्षक,न.प.मलकापूर यांनी सभेसमोर सादर केलेला आहे.

वरील सर्वबाबींची विचार करता आरोग्य निरीक्षक न.प.मलकापूर यांनी सादर केलेल्या अहवालानुसार सदर कामांकरीता येणारा खर्च न.प.निधी / 15 वा वित्त आयोग निधी अंतर्गत करण्यास ही सभा मान्यता देत आहे.

**विषय क्र.17. :- प्रभाग क्र.3 मध्ये नाली बांधकामबाबत.(न.प.निधी.नगरोत्थान,दलितेत्तर निधी अंतर्गत)**

प्रभाग क्र.3 मध्ये नाली बांधकामबाबतच्या (न.प.निधी.नगरोत्थान, दलितेत्तर निधी अंतर्गत) विषयाची मा.मुख्याधिकारी नगर परिषद मलकापूर यांच्या टिपणीचे वाचन सभेसमोर करण्यात आले.त्यावर विस्तृत चर्चा करण्यात आली.

ठरविण्यात येते की,प्रभाग क्र.3 मध्ये लख्खाणी प्लॉट ते नांदुरा रोड नाली बांधकामाकरिता श्री.विजयराव जाधव मा.नगराध्यक्ष यांचे पत्र प्राप्त झाले असून सदर भागात नाली नसल्यामुळे घाणपाणी व पावसाळयाचे पाणी साचून आरोग्यास धोका निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही.असा नगर अभियंता बांधकाम विभाग यांनी अहवाल सभेसमोर सादर केलेला आहे.या



Scanned with CamScanner

कामाकरीता येणारा खर्च .न.प.निधी.नगरोत्थान, दलितेत्तर निधी अंतर्गत करावा लागेल.असे नमुद केले आहे

वरील सर्व बाबींचा विचार करता उपरोक्त काम करण्यास व येणारा खर्च न.प.निधी.नगरोत्थान,दलितेत्तर निधी अंतर्गत करण्यास ही सभा मान्यता देत आहे.

**विषय क्र.18. :- प्रभाग क्र.13 मध्ये नाली बांधकाम करणेबाबत निर्णय घेणे.(न.प.निधी.नगरोत्थान, दलितेत्तर निधी अंतर्गत)**

प्रभाग क्र.3 मध्ये नाली बांधकामबाबत.(न.प.निधी.नगरोत्थान,दलितेत्तर निधी अंतर्गत) विषयाची मा.मुख्याधिकारी नगर परिषद मलकापूर यांच्या टिपणीचे वाचन सभेसमोर करण्यात आले.त्यावर विस्तृत चर्चा करण्यात आली.

ठरविण्यात येते की,प्रभाग क्र.13 मध्ये नारायणदास निहलानी ते हॉटेल साक्षी पर्यत नाली बांधकामाकरिता श्री.नारायणदास निहलाणी मा.नगराध्यक्ष यांचे पत्र प्राप्त झाले असून त्यांनी सदर भागात नाली बांधकाम करणे जरुरीचे असल्याचे सांगीतले.सदर नाली शिकस्त झाल्यामुळे बराचसा भाग पडून घाणपाण्याचा व्यवस्थीत निचरा होत नसून घाणपाणी साचलेले राहते.सदर जागेवर नालीचे बांधकाम करणे आवश्यक असल्याचा अहवाल नगर अभियंता यांनी सभेसमोर सादर केला आहे. सदर कामाकरीता येणारा खर्च .न.प.निधी.नगरोत्थान, दलितेत्तर निधी अंतर्गत करावा लागेल.असे नमुद केले आहे.

वरील सर्व बाबींचा विचार करता उपरोक्त काम करण्यास व येणारा खर्च न.प.निधी.नगरोत्थान,दलितेत्तर निधी अंतर्गत करण्यास ही सभा मान्यता देत आहे.

**विषय क्र.19. :- न.प.हद्दीतील विविध प्रभागात करावयाच्या विकास कामे करण्याबाबत**

न.प.हद्दीतील विविध प्रभागात करावयाच्या विकास कामे करण्याबाबतच्या कामाची मा.मुख्याधिकारी नगर परिषद मलकापूर यांचे कार्यालयीन टिपणीचे वाचन सभेसमोर करण्यात आले.त्यावर विस्तृत चर्चा करण्यात आली.

ठरविण्यात येते की,मा.आमदार श्री.राजेशजी एकडे मलकापूर विधानसभा मतदार संघ यांनी नगर परिषद हद्दीतील विविध प्रभागात सोबतच्या



Scanned with CamScanner

यादीतील कामे त्या भागातील नागरीकांच्या दृष्टीने करणे अत्यंत जरुरीचे असल्याने नगरोत्थान योजना अथवा नागरि दलितेत्तर योजनेतून कामे घेण्याबाबत सुचविले आहे.

| अ.क्र. | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम |
|---|---|---|
| 1 | संजय पाटील यांचे घरापासून ते डॉ.विपूल पाटील यांचे घरापर्यत व विशाल दवे यांचे घरापासून ते बंटी पाटील यांचे घरापर्यंत एका बाजूने नाली बांधकाम करणे (अनिल गांधी) | 15. लक्ष |
| 2 | i) शे.समशेर ऑटोवाले यांचे घरामागील दोन गल्ल्यामध्ये रस्ता कॉंक्रीटीकरण<br>ii) समशेर ऑटोवाले यांचे घरापसून ते शे.महेबूब यांचे घरापर्यत रस्ता कॉंक्रीटीकरण करणे (डॉ.सलीम) | 10.लक्ष |
| 3 | बद्री कॉम्पलेक्स परिसरामध्ये नारखेडे यांचे घरापासून ते मारवाडी ढाबा यांचे मागील रस्ता कॉंक्रीटीकरण व नाली बांधकाम करणे (अनिल जैस्वाल) | 10.लक्ष |
| 4 | नसवाला चौक ते किल्ला चौक पर्यत रस्ता कॉंक्रीटीकरण व नाली बांधकाम करणे.(राजू पाटील) | 20.लक्ष |
| 5 | द्वारकानगरमध्ये हेमंत शर्मा यांचे घरापासून ते बोंडे काका यांचे घरापर्यत रस्ता कॉंक्रीटीकरण करणे (बंडू चवरे) | 10.लक्ष |
| 6 | डॉ.मनोज पाटील ते कोलते हॉस्पिटलपर्यंत रस्ता डांबरीकरण व्करणे व दोन्ही बाजूने नाली बांधकाम करणे (डॉ.कोलते) | 15.लक्ष |
| 7 | प्रभाग क्र.9 मध्ये काशीपूरा मोरी पासून ते ढोले यांचे घरापर्यत रस्ता सिमेंट कॉक्रीटीकरण करणे (हरीश रावळ) | 14.91 लक्ष |
| 8 | प्रभाग क्र.14 मध्ये ज्ञानेश्वर नगर मध्ये प्रल्हाद सातव यांचे घरापासून गणबास यांचे घरापर्यत सिमेंट कॉंक्रीट रस्ता व दोन्ही बाजूने नाली बांधकाम करणे.(हरीश रावळ) | 13.18 लक्ष |
| 9 | उपजिल्हा रुग्णालय मलकापूर समोरील रस्ता डांबरीकरण | 14.00 लक्ष |



Scanned with CamScanner

| | | |
|---|---|---|
| | करणे(हरीश रावळ) | |
| 10 | मदनलाल संचेती शाळेपासून ते गुरुद्वारापर्यंत रस्ता डांबरीकरण व एका बाजूने नाली बांधकाम करणे(रशिद खॉ जमादार) | 35. लक्ष |
| 11 | निळे कॉम्प्लेक्स पासून ते गजानन बावस्कर यांचे घरापर्यंत रस्ता कॉंक्रीटीकरण व एका बाजूने नाली बांधकाम करणे(शाम राठी) | 10.लक्ष |
| 12 | अरबी मदरसा पासून ते चुना कब्रस्थानपर्यंत व सलीम बम्बय्या यांचे घरापासून ते अहमद खान यांचे घरापर्यंत रस्ता कॉंक्रीटीकरण व एका बाजूने नाली बांधकाम करणे व हिदायत जमादार यांचे घरापासून ते असगर सर यांचे घरापर्यंत रस्ता कॉंक्रीटीकरण करणे.(रईस जमादार) | 15.लक्ष |
| 13 | प्र.क्र.2मध्ये छत्रपती शिवाजी महाराज पुतळा ते येडेश्वरी माता मंदीपर्यंत रस्ता कॉंक्रीटीकरण व एका बाजूने सिमेंट कॉंक्रीट नाली बांधकाम करणे.(राजेंद्र वाडेकर) | 16.31 लक्ष |
| 14 | शिवाजी नगर प्रभाग क्र.2 मधील शिवाजी नगर वार्डात अंतर्गत सिमेंट कॉक्रीट गटार बांधणे छत्रपती शिवाजी महारात पुतळा ते हनुमान मंदीरापर्यंत.(राजेंद्र वाडेकर) | 15.लक्ष |
| 15 | अफसर मेमन किराणा पासून ते अन्वरखान यांचे घरापर्यंत नाली बांधकाम व कॉंक्रीटीकरण करणे.(रईस जमादार) | 10.लक्ष |
| | एकूण | 223.4.लक्ष |

वरील प्रस्तावित केलेली कामे ही सन 2022-2023 या आर्थिक वर्षात प्राप्त होणाऱ्या जिल्हास्तर नगरोत्थान योजना / दलितेत्तर योजने अंतर्गत कामे करण्याबाबत नगर अभियंता बांधकाम विभाग नगर परिषद मलकापूर यांनी अहवाल सभेसमोर सादर केला आहे.

वरील सर्वबाबीचा विचार करता नगर अभियंता बांधकाम विभाग न.प.मलकापूर याचे उपरोक्त अहवालानुसार काम क्र. 1 ते 15 सन 2022-2023 अंतर्गत जिल्हास्तर नगरोत्थान योजना / दलितेत्तर योजने अंतर्गत करण्यास हि सभा मान्यता देत आहे.

**आर यु सुरडकर**
**प्रशासक**
**नगरपरिषद मलकापूर**



Scanned with CamScanner